बुलडाणा ◆ वर्ष - १ ◆ अंक -१७८◆ पृष्ठे - ४ ◆ RNI No . MHBIL/२५/A१४३५ ◆ batamijagata@gmail. com ◆ मुख्य संपादक : कैलास हरीभाऊ राऊत - ९५६१५९६६९३ ◆ मानद संपादक : गणेश निकम केळवदकर - ९४०३४७८५४०

दैनिक शनिवार, दि. १८ जुलै २०२६ आवाज जनसामान्यांच्या हक्काचा

# बातमी जगत

TRENDING NEWS

सोनम वांगचुकवर आमिर खानने सोडले मौन:म्हटले- 3 इडियट्स त्यांच्यावर बनला नाही, मी त्यांना ओळखतही नव्हतो; आरोग्यावर म्हटले- त्यांच्यासाठी चिंतित



पान ३ वर

## # SHORT NEWS

### सोनसाखळी लंपास

**यवतमाळ :** येथील जांब रोडवरील सुयोग मंगल कार्यालयाजवळून एका ६० वर्षीय महिलेच्या गळ्यातील १० ग्रॅमची सोन्याची पोत अज्ञात चोरट्याने लंपास केली. सौ. रेखा दिलीपराव चोंडके यांनी या प्रकरणी अवधूतवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून, चोरी गेलेल्या पोतची किंमत १५,६३६ रुपये आहे. ही घटना ११ मे रोजी दुपारी २:०० वाजताच्या सुमारास घडली.

### ८ लाखांची फसवणूक

**यवतमाळ :**उमरसरा येथील एका ७३ वर्षीय व्यक्तीच्या मुलाला नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून ८ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. सुरज शरद गामरे (रत्नागिरी) आणि गणेश वसंतराव झाडे (यवतमाळ) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांनी फिर्यादी दत्तात्रेय देशकर यांच्या मुलाकडून ५ लाख आणि त्यांच्या नातेवाईकाकडून ३ लाख रुपये घेऊन ही फसवणूक केली. अवधूतवाडी पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे.

### कारची चोरी

**यवतमाळ :** लोहारा पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या वाघापूर येथील सह्याद्री अपार्टमेंटमधून एम.एच. ३२ वाय. ०८५७ क्रमांकाची स्विफ्ट डिझायर कार चोरीला गेली आहे. जितेंद्र माणिकराव गुजर यांनी याप्रकरणी तक्रार दाखल केली असून, कारची किंमत २ लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे. ही घटना १० मे रोजी रात्रीच्या सुमारास घडली.

### उमरखेडमध्ये घरफोडी

**उमरखेड :** तालुक्यातील कुपटी येथे अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण २,२२,००० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. पोफाळी पोलिसांनी या प्रकरणी सौ. सुमनबाई सूर्यवंशी यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला आहे. चोरट्याने १.०२ लाखांचे दागिने आणि १.२० लाखांची रोकड लंपास केली आहे.

### मोटारींच्या केबलची चोरी

**घाटंजी :** तालुक्यातील सायफळ शिवारात पैनगंगा नदीकाठी असलेल्या शेतकरी मोटारींच्या केबलवर चोरट्यांनी डल्ला मारला आहे. नागोराव दत्ता राठोड यांच्यासह इतर शेतकऱ्यांचे मिळून सुमारे २३०० फूट केबल (किंमत २३,००० रुपये) चोरून नेण्यात आले आहे. याप्रकरणी पारवा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

### साहित्याची चोरी

**घाटंजी :** तालुक्यातील आमडी येथे एका ३७ वर्षीय इसमाने दारूच्या नशेत लोखंडी पोल पाडून त्यावरील लाईट, सोलर प्लेट आणि इतर साहित्य असा एकूण १०,००० रुपयांचा माल चोरून नेला. सपना अमोल ठाकरे यांच्या तक्रारीवरून घाटंजी पोलिसांनी संशयित आरोपी बबलू उर्फ गणेश रमेश चव्हाण याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## ◆ आंदोलकांचा विरोध, वांगचुक 21 दिवसांपासून उपोषणावर, 9.5 किलो घटले वजन

# उपोषणकर्ते वांगचुक यांना रुग्णालयात नेले

बातमी जगत | प्रतिनिधी

**नवी दिल्ली :** दिल्ली पोलिसांनी शनिवारी सकाळी जंतर-मंतरवर उपोषणाला बसलेल्या सोनम वांगचुक यांना सफदरजंग रुग्णालयात नेले. यावेळी आंदोलकांनी पोलिसांना रोखण्याचा प्रयत्न केला. यामुळे तिथे काहीसा गोंधळ निर्माण झाला.



पेपरफुटी प्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी वांगचुक गेल्या 21 दिवसांपासून उपोषणावर आहेत. त्यांचे वजन 9.5 किलोपेक्षा जास्त कमी झाले आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने गुरुवारी केंद्र आणि दिल्ली सरकारला आदेश दिला होता की, वांगचुक यांची दररोज वैद्यकीय तपासणी करावी आणि गरज पडल्यास उपचार करावेत. डॉक्टरांच्या मते, वांगचुकचे वजन आतापर्यंत 9.5 किलोने घटले आहे. शुक्रवारी 24 तासांत त्यांचे वजन आणखी 350 ग्रॅमने कमी होऊन 56.55 किलो झाले होते. वांगचुकसोबत आयसाचे नेहा, आमीन आणि मनीष हे देखील गेल्या 21 दिवसांपासून उपोषणावर आहेत. नेहा यांना गंभीर हायपोग्लायसेमियामुळे रुग्णालयात दाखल करण्याचा सल्ला देण्यात आला आहे, तर आमीन आणि मनीष यांची प्रकृतीही सतत खालावत आहे. निदर्शनात सहभागी असलेल्या एका व्यक्तीने सांगितले की, आज सकाळी १० पोलीस कर्मचारी वैद्यकीय पथक असल्याचे सांगून आत आले. त्यांच्या वागण्या-बोलण्यावरून ते डॉक्टर नसून पोलीस अधिकारी आहेत, हे आमच्या लक्षात आले. त्यांनी सर्व स्वयंसेवकांना बाजूला होण्यास सांगितले. आम्ही त्यांना थांबण्याची विनंती करत राहिलो, पण अचानक त्यांनी जाहीर केले की उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार त्यांना सोनम सरांना सोबत घेऊन जावे लागेल. त्यावेळी अभिजीत प्रसाधनगृहात (रेस्टरूम) गेला होता. मला शंका आहे की त्यालाही ताब्यात घेण्यात आले आहे; म्हणूनच तो परत येऊ शकत नाही आणि त्याचा फोनही लागत नाहीये. सर्व पोलीस कर्मचारी साध्या वेशात होते. दिल्ली डीसीपींनी X वर जाहीर केले की, दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आणि प्रकृती खालावत असल्यामुळे सोनम वांगचुक यांना आवश्यक वैद्यकीय उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करताना, आंदोलकांनी अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे थोडा गोंधळ निर्माण झाला; तथापि, पोलिसांनी शांतता राखली आणि हे काम सुरक्षितपणे पार पाडले. आम्ही जंतर मंतर येथील आंदोलकांना आवाहन करतो की त्यांनी शांततेने आणि लवकरात लवकर जागा रिकामी करावी. शुक्रवारी रात्री उशिरा जारी केलेल्या एका व्हिडिओमध्ये, जंतरमंतर येथे आंदोलन करत असलेल्या वांगचुक यांनी म्हटले, "मी अजूनही जिवंत आहे. माझ्या शरीराचा २०% भाग क्षीण झाला आहे. शरीरातील चरबी संपल्यानंतर स्नायू झिजायला लागतील. त्यानंतर मेंदूवर परिणाम होईल... पण ती अवस्था अजून आलेली नाही." यापूर्वी त्यांनी म्हटले होते, "काहीही झाले तरी २० जुलै रोजी संसदेवर मोर्चा काढला जाईल आणि मी जिवंत असेन. जर लोक आले नाहीत, तर मी एका भूताच्या रूपात परत येईन." 'कॉकरोच जनता पार्टी'ने धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत २० जुलै रोजी संसदेवर मोर्चा काढण्याचे आवाहन केले आहे.

### राज्याचा दर्जा देण्याची मागणी, वांगचुक 170 दिवस तुरुंगात

**✦ वांगचुक यापूर्वी लडाखला पूर्ण राज्याचा दर्जा देण्याच्या मागणीसाठी 170 दिवस जोधपूर तुरुंगात होते. त्यांच्यावर आरोप होता की, उपोषण सुरू असताना 24 सप्टेंबर 2025 रोजी लेह-मध्ये हिंसाचार झाला, ज्यात 4 लोकांचा मृत्यू झाला आणि 90 लोक जखमी झाले. सरकारने वांगचुकवर हिंसा भडकवल्याचा आरोप केला. त्यानंतर दोन दिवसांनी, 26 सप्टेंबर रोजी त्यांना राष्ट्रीय सुरक्षा अधिनियम (NSA) अंतर्गत ताब्यात घेऊन जोधपूर कारागृहात पाठवण्यात आले.**

# देशामध्ये मुलींत प्रथम आलेल्या पुण्याच्या श्रावणीने 2 वर्षे मोबाइलला हात नाही लावला

बातमी जगत | प्रतिनिधी

**पुणे :** दौंड तालुक्यातील खडकीची श्रावणी कृष्णा कुदळे हिने 'नीट यूजी-२०२६' मध्ये ७२० पैकी ७१० गुण मिळवत देशात ५ वा क्रमांक पटकावला आहे. ती देशात मुलींमध्ये पहिली, तर महाराष्ट्रासह ओबीसी प्रवर्गात



अव्वल ठरली. यश मिळवण्यासाठी तिने २ वर्षे मोबाइल व सोशल मीडियापासून दुरावा ठेवला आणि मागील १० वर्षे घरात टीव्ही न पाहता कठोर परिश्रम घेतले. श्रावणीचे आई-वडील दोघेही जिल्हा परिषद शाळेत शिक्षक आहेत. तिचे प्राथमिक शिक्षण चोरमले वस्तीवरील (गोपाळवाडी) जि. प. शाळेत, तर पुढील शिक्षण बारामतीमधील माळेगावच्या शारदाबाई पवार विद्यानिकेतनमध्ये झाले. नववीपासूनच तिने वैद्यकीय शिक्षणाचे ध्येय ठेवले होते. नियमित अभ्यास, संकल्पनांची स्पष्टता आणि प्रश्नपत्रिकांचा सराव ही तिच्या यशाची त्रिसूत्री ठरली. प्रश्नसंच सराव महत्त्वपूर्ण सक्सेस कोड ॲकॅडमीचे डॉ. विराज येळे आणि अण्णासाहेब भुजबळ म्हणाले, "ग्रामीण भागात राहूनही 'नीट'ची चांगली तयारी होऊ शकते. श्रावणी जिद्दी असल्याने तिने सकाळी ९ ते ४ वाजेपर्यंत प्रश्नसंचांचा मोठा सराव केला. क्लासनंतर घरीही ती ६ तास प्रामाणिक अभ्यास करत असे." ट्राय युवर बेस्ट, वुई आर विथ यु : वडील कृष्णा कुदळे म्हणाले, "मुलांवर ताण न देता घरात अभ्यासाचे पूरक वातावरण द्यावे. श्रावणी रोज १२-१३ तास अभ्यास करायची. शंका दूर करण्यावर तिचा भर होता. घरात 'लक्ष्य ७२०' आणि 'ट्राय युवर बेस्ट, वुई आर विथ यु' अशी लावलेली फ्रेम तिच्यासाठी प्रेरणादायी ठरली."

# कार्यकर्त्यावर हल्ला; व्हिडिओ कॉलवर नगरसेवक म्हणाला, 'मुंडके घेऊन या':बीडमध्ये राष्ट्रवादीच्या नगरसेवकासह 10 जणांवर गुन्हा दाखल

बातमी जगत | प्रतिनिधी

**बीड :** शहरातील चांदापूर रोडवरील एका पेट्रोलपंपाजवळ राजकीय वैमनस्यातूनकार्यकर्त्यावर कोयता व लोखंडी रॉडनेप्राणघातक हल्ला झाल्याची घटना घडली.यात कार्यकर्त्याचे दोन्ही हात व दोन्ही पायफ्रॅक्चर झाले आहेत. डोक्याला गंभीरदुखापत झाली. हल्ला सुरू असताना मुख्यसूत्रधार नगरसेवकाने थेट व्हिडिओ कॉलकरून "मुंडके माझ्याकडे घेऊन या," असाआदेश हल्लेखोरांना दिला. याप्रकरणीपरळी शहर ठाण्यात पीडित अभिजीतकांबळे याच्या जबाबावरून परळी शहरपोलिसांनी नगरसेवक नितीन रोडे तसेचआनंद विलास कांबळे, सुरेश चौंडे, रतनआदोडे, संतोष इंदरकर ऊर्फ बन्नी, रोहनऊर्फ गब्बर साळवे, दत्ता कुरूप व इतर ३अनोळखी व्यक्तींवर गुन्हा दाखल केला.

अभिजित नागेश कांबळे (२९, रा.भीमनगर, परळी वै.) हा युवक परळीशहरात गेल्या ३-४ वर्षांपासून राजकीयकार्यकर्ता म्हणून सक्रिय आहे. १२ जुलै रोजी तो चांदापूर रोडवरील पेट्रोलपंपाजवळील वॉशिंग सेंटरवर दुचाकीधुण्यासाठी ठेवून शेजारच्या चहाच्याहॉटेलवर बसला होता. त्यावेळी जुन्याराजकीय वादाचा राग मनात धरून रतनआदोडे, आनंद कांबळे, सुरेश चौंडे,संतोष इंदरकर ऊर्फ बन्नी, रोहन ऊर्फगब्बर साळवे हे हत्यारांसह तेथे आले.आनंद कांबळे याने अभिजीतच्या डोक्यातलोखंडी रॉड मारला. "याला पकडा.मारून टाका. हा नितीन रोडे साहेबांचाआदेश आहे," असे तो ओरडू लागला. मारहाण सुरू असतानाच हल्लेखोरांपैकीएकाच्या मोबाइलवर नगरसेवक नितीनरोडे याचा व्हिडिओ कॉल आला.व्हिडिओ कॉलवर नितीन रोडे यानेअभिजीतला अश्लील शिवीगाळ केली."आता कसं वाटतंय? याच्या पायावरनको. मुंडक्यावर मारा. मुंडकं माझ्याकडेघेऊन या," असा थेट आदेश त्याने दिला.

### हल्ल्यात तरुणाचे दोन्ही हात व दोन्ही पाय फ्रॅक्चर

**✦ अभिजीतचे मित्र हनुमान झोडगे वचरण पैठणे यांनी त्याला तातडीनेरिक्षामधून परळीच्या सरकारीरुग्णालयात दाखल केले. तेथेप्राथमिक उपचार झाले. डोक्याला टाकेघालण्यात आले. त्यानंतर पुढीलउपचारासाठी त्याला अंबाजोगाईयेथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयातहलवण्यात आले आहे. तेथीलडॉक्टरांनी अभिजीतचे दोन्ही हात वदोन्ही पाय फ्रॅक्चर झाल्याचे घोषित केले आहे. सध्या त्याच्यावर वॉर्ड क्र.१३ मध्ये उपचार सुरू आहेत.**

# कार्यकर्त्यावर हल्ला; व्हिडिओ कॉलवर नगरसेवक म्हणाला, 'मुंडके घेऊन या

बातमी जगत | प्रतिनिधी

**बीड :** शहरातील चांदापूर रोडवरील एका पेट्रोलपंपाजवळ राजकीय वैमनस्यातूनकार्यकर्त्यावर कोयता व लोखंडी रॉडनेप्राणघातक हल्ला झाल्याची घटना घडली.यात कार्यकर्त्याचे दोन्ही हात व दोन्ही पायफ्रॅक्चर झाले आहेत. डोक्याला गंभीरदुखापत झाली. हल्ला सुरू असताना मुख्यसूत्रधार नगरसेवकाने थेट व्हिडिओ कॉलकरून "मुंडके माझ्याकडे घेऊन या," असाआदेश हल्लेखोरांना दिला. याप्रकरणीपरळी शहर ठाण्यात पीडित अभिजीतकांबळे याच्या जबाबावरून परळी



शहरपोलिसांनी नगरसेवक नितीन रोडे तसेचआनंद विलास कांबळे, सुरेश चौंडे, रतनआदोडे, संतोष इंदरकर ऊर्फ बन्नी, रोहनऊर्फ गब्बर साळवे, दत्ता कुरूप व इतर ३अनोळखी व्यक्तींवर गुन्हा दाखल केला.

अभिजित नागेश कांबळे (२९, रा.भीमनगर, परळी वै.) हा युवक परळीशहरात गेल्या ३-४ वर्षांपासून राजकीयकार्यकर्ता म्हणून सक्रिय आहे. १२ जुलै रोजी तो चांदापूर रोडवरील पेट्रोलपंपाजवळील वॉशिंग सेंटरवर दुचाकीधुण्यासाठी ठेवून शेजारच्या चहाच्याहॉटेलवर बसला होता. त्यावेळी जुन्याराजकीय वादाचा राग मनात धरून रतनआदोडे, आनंद कांबळे, सुरेश चौंडे,संतोष इंदरकर ऊर्फ बन्नी, रोहन ऊर्फगब्बर साळवे हे हत्यारांसह तेथे आले.आनंद कांबळे याने अभिजीतच्या डोक्यातलोखंडी रॉड मारला. "याला पकडा.मारून टाका. हा नितीन रोडे साहेबांचाआदेश आहे," असे तो ओरडू लागला. मारहाण सुरू असतानाच हल्लेखोरांपैकीएकाच्या मोबाइलवर नगरसेवक नितीनरोडे याचा व्हिडिओ कॉल आला.व्हिडिओ कॉलवर नितीन रोडे यानेअभिजीतला अश्लील शिवीगाळ केली."आता कसं वाटतंय? याच्या पायावरनको. मुंडक्यावर मारा. मुंडकं माझ्याकडेघेऊन या," असा थेट आदेश त्याने दिला.

दिला.या आदेशानंतर सुरेश चौंडे याने लोखंडीरॉड थेट अभिजीतच्या डोक्यात मारला.त्यामुळे तो जागीच कोसळला. अभिजीतनिपचित पडल्याचे पाहून आरोपीगाड्यांवर बसून पसार झाले.

# भाजपने म्हटले- राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांचे विलीनीकरण करा

बातमी जगत | प्रतिनिधी

**मुंबई :** राज्यात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्ष हे दोन्ही पक्ष एकत्र येऊ शकतात. त्यांना एकत्र येण्याची ऑफर एनडीएने दिली आहे.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, केंद्र सरकार यावेळी संसदेत महिला आरक्षण विधेयक आणि परिसीमन विधेयकाशी संबंधित घटनादुरुस्ती विधेयक आणणार आहे. म्हणूनच एनडीएच्या पक्ष नेतृत्वाने राष्ट्रवादी काँग्रेस (NCP) च्या दोन्ही गटांनी पुन्हा एकत्र येऊन एनडीएचा सहयोगी पक्ष बनावे, असा सल्ला दिला आहे. सूत्रांनुसार, भाजपने राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांमध्ये सत्तेचा समतोल राखण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळात दोन पदे देण्याचीही ऑफर दिली आहे. दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष काँग्रेस आणि भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए या दोघांशीही चर्चा करण्यास तयार आहे. सूत्रांनुसार, राष्ट्रवादी काँग्रेस (एसपी) चे 8 लोकसभा खासदार आणि 10 आमदार पक्षाच्या भवितव्याबाबत दोन गटांमध्ये विभागले गेले आहेत. काही खासदार आणि आमदार एनडीएमध्ये सामील होण्याच्या बाजूने आहेत, तर काही काँग्रेसमध्ये विलीनीकरण करू इच्छितात, असा दावा करण्यात आला आहे. शरद पवार काँग्रेसमध्ये विलीन होण्यास तेव्हाच तयार होतील, जेव्हा सुप्रिया सुळे यांना पक्षात मोठी जबाबदारी मिळेल. यामध्ये महाराष्ट्र काँग्रेस अध्यक्षपदी पवार समर्थक, सुप्रिया सुळे यांना काँग्रेसचे उपाध्यक्ष बनवणे आणि काँग्रेस कार्यकारिणी (CWC) मध्ये पुरेसे प्रतिनिधित्व यांसारख्या मागण्यांचा समावेश असल्याचे सांगितले जात आहे. दुसरीकडे, एका अन्य सूत्राचा दावा आहे की, पक्षाचा एक प्रभावशाली गट भाजप आणि एनडीए सोबत जाण्याचा समर्थक आहे. चर्चेत सुप्रिया सुळे यांच्यासाठी केंद्रीय मंत्रीपद आणि पवार समर्थकांसाठी दोन मंत्रीपदांवर चर्चा झाल्याचाही दावा करण्यात आला आहे. मात्र, यावर कोणत्याही बाजूने अधिकृत दुजोरा देण्यात आलेला नाही.

# सावधान ! शुभमंगलांना सिंहस्थात 3 महिने विराम:सिंहस्थ पर्वाची सुरुवात होताच नेहमीच्या मुहूर्तांना लागणार ब्रेक

बातमी जगत | प्रतिनिधी

**नाशिक :** ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी गुरूचा सिंह राशीत प्रवेश होताच नाशिक-त्र्यंबकेश्वरच्या सिंहस्थ पर्वाला प्रारंभ होणार आहे. या दिवसापासून ते २४ जानेवारी २०२७ पर्यंत विवाहासह बहुतांश मंगल कार्यांसाठी नियमित शुभमुहूर्त नसल्याने राज्यभरातील हजारो विवाह पुढे ढकलले जाण्याची शक्यता आहे. परिणामी विवाह हॉल, केटरर्स, डेकोरेशन, बँड, फोटोग्राफी आणि इतर विवाहाशी संबंधित व्यवसायांवरही या कालावधीचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



पंचांगकारांच्या माहितीनुसार, गुरू सिंह राशीत प्रवेश केल्यानंतर मघा नक्षत्र आणि पूर्वाफाल्गुनी नक्षत्राच्या पहिल्या चरणात भ्रमण करणारा कालावधी हा ३१ ऑक्टोबर २०२६ ते २४ जानेवारी २०२७ पर्यंत असल्याने या काळात नियमित विवाहमुहूर्त दिले जात नाहीत. सनातन परंपरेनुसार सिंहस्थ हा स्नान, दान, जप, तप आणि धार्मिक साधनेचा पर्व मानला जातो. त्यामुळे विवाहासारखी मंगल कार्ये टाळण्याची परंपरा अनेक पिढ्यांपासून पाळली जात आहे. मंगल कार्याऐवजी धार्मिक उपासनेला प्राधान्य : नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे सिंहस्थ पर्वाला विशेष धार्मिक महत्त्व आहे. या काळात लाखो भाविक गोदावरी स्नान, विविध धार्मिक विधी व साधना करण्यासाठी येथे येतात. त्यामुळे धार्मिक मंगल कार्यांऐवजी अध्यात्मिक उपासनेला प्राधान्य असते. अत्यावश्यक प्रसंगी 'आपत्कालीन मुहूर्ता'चा पर्याय : नियमित विवाहमुहूर्त उपलब्ध नसले तरी अत्यंत अपरिहार्य परिस्थितीत 'आपत्कालीन मुहूर्त' काढून घेण्याची शास्त्रमान्य परंपरा आहे. परदेशस्थ वधू-वर, सैन्य सेवेमुळे मर्यादित रजा मिळणे, गंभीर कौटुंबिक कारणे किंवा इतर निकडीच्या परिस्थितीत ज्योतिषतज्ज्ञ कुंडली, ग्रहस्थिती आणि शास्त्राधारित निकषांचा अभ्यास करून असे मुहूर्त निश्चित करतात.

आपत्काल हा सापेक्ष; त्याचा वापर विशेष परिस्थितीतच करावा सिंहस्थकाळ हा साधना, दान, जप आणि स्नानाचा धार्मिक पर्व मानला जातो. त्यामुळे या काळात मंगल कार्ये न करण्याची परंपरा आहे. तरीही अत्यंत निकडीच्या प्रसंगी शास्त्रानुसार आपत्कालीन मुहूर्ताची व्यवस्था आहे. मात्र वापर विशेष परिस्थितीत करावा. या स्थिती कालपरत्वे अशा : पूर्वीच्या काळी बालवयात विवाह होत. त्यानंतर मुली वयात येत असत. अशा वेळी वयात आलेल्या मुलीचा रजोकाल हा आपत्काल मानला जात असे. आधुनिक काळात वयाच्या तिशीनंतरही विवाह होतात. त्यात मुहूर्त नाही म्हणून १ वर्ष थांबणे अशक्य असते, ही स्थितीदेखील आपत्काल समजता येते. गोदावरीचा उत्तर काठ व गंगेचा दक्षिण काठ येथे सिंहस्थातील वर्षभर विवाह करता येत नाहीत. महाराष्ट्रात गोदावरीच्या उत्तरकाठी छत्रपती संभाजीनगर, अकोला, अमरावती हा भाग येतो. त्यात सिंहस्थाच्या वर्षभर विवाह व्यर्ज असतात. तर, गंगेच्या दक्षिण काठाच्या निकषानुसार नांदेड, परभणी, लातूर, परभणी येथे विवाह केलेला चालतो. वर्ज्य स्थितीत आपत्कालीन मुहूर्त काढता येतो. सिंहस्थ पर्वकाळात नियमित विवाहमुहूर्त दिले जात नाहीत. मात्र काही अपरिहार्य कारणे असल्यास शास्त्रमान्य पद्धतीने कुंडलीचा अभ्यास करून 'आपत्कालीन मुहूर्त' निश्चित करता येतो. हा अपवाद असून, शक्यतो सिंहस्थ संपल्यानंतरच विवाह करण्यालाच प्राधान्य दिले जाते. -नरेंद्र धारणे, धर्म अभ्यासक

## घटना – घडामोडी

### जिथे जेवाल तिथेच छेद कराल!:सुनील तटकरेंवर रामदास कदमांची टीका, जयंत पाटलांच्या भेटीवरही स्पष्ट केली भूमिका

बातमी जगत | प्रतिनिधी

**रत्नागिरी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)चे नेते जयंत पाटील यांनी घेतलेल्या भेटीमुळे राज्याच्या राजकारणात विविध चर्चांना उधाण आले असतानाच, शिवसेना नेते रामदास कदम यांनी या घडामोडींवर प्रतिक्रिया देताना सुनील तटकरेंवर जोरदार टीका केली. मात्र, जयंत पाटील यांच्या भेटीत कोणतेही संशयास्पद राजकारण पाहण्याचे कारण नसल्याचे सांगत त्यांनी त्यांची पाठराखण केली. रामदास कदम म्हणाले की, विरोधी पक्षातील आमदार किंवा नेत्यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेण्यात काहीही गैर नाही. "मुख्यमंत्र्यांना कोणीही भेटू शकतो. मतदारसंघातील किंवा इतर कोणत्याही कामासाठी भेट घेणे ही सामान्य बाब आहे. प्रत्येक भेटीमागे राजकीय अर्थ काढण्याची गरज नाही," असे त्यांनी स्पष्ट केले. जयंत पाटील यांच्याबद्दल बोलताना कदम म्हणाले, "जयंत पाटील अतिशय स्वच्छ प्रतिमेचे आणि चांगले व्यक्तिमत्त्व असलेले नेते आहेत. मी त्यांना जवळून ओळखतो. त्यांच्या चारित्र्यावर किंवा भूमिकेवर संशय घेण्याचे कोणतेही कारण नाही." यावेळी सुनील तटकरेंबाबत विचारलेल्या प्रश्नावर रामदास कदम यांनी अत्यंत आक्रमक शब्दांत टीका केली. "सुनील तटकरे कुणाचेच कायमचे होऊ शकत नाहीत. जिथे जेवेल तिथेच छेद करेल," अशा शब्दांत त्यांनी तटकरेंवर निशाणा साधला. पुढे त्यांनी, "तटकरेंबाबत अधिक बोलणे योग्य ठरणार नाही," असेही म्हटले. शिवसेना उबाठाचे नेते भास्कर जाधव यांच्या वक्तव्यांवरही रामदास कदम यांनी टीका केली. ते म्हणाले, "भास्कर जाधव यांच्या मनात सतत विरोधी पक्षनेतेपदाचेच विचार सुरू असतात. विधिमंडळात त्यांनी ज्या पद्धतीने भाष्य केले, ते पाहून वाईट वाटले. त्यांनी संयमाने बोलण्याची गरज आहे." उद्धव ठाकरे यांच्या हिंदुत्वाच्या भूमिकेवरही कदम यांनी टीका केली. "जे काँग्रेससोबत गेले, सोनिया गांधींसोबत राजकारण केले आणि राहुल गांधींसोबत मैत्री दाखवली, त्यांनी आता हिंदुत्वाची भाषा करणे हा मोठा विनोद आहे. जनता सर्व काही पाहत आहे," असा टोला त्यांनी लगावला. भाजप नेते आशिष शेलार यांनी विरोधी पक्षाच्या आमदाराची घेतलेली भेट योग्य असल्याचे सांगत कदम म्हणाले, "लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी भेट दिली असेल तर त्यात काहीही चुकीचे नाही. पक्षीय राजकारणाच्या पलीकडे जाऊन अशा भेटी होत असतात. त्याबद्दल त्यांचे कौतुकच केले पाहिजे." दरम्यान, जयंत पाटील यांच्या मुख्यमंत्री भेटीनंतर राज्यात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या संभाव्य राजकीय भूमिकेबाबत विविध तर्क-वितर्क सुरू आहेत. मात्र, या भेटीमागे कोणताही ठोस राजकीय निष्कर्ष काढण्याची घाई करू नये, असे संकेत रामदास कदम यांनी आपल्या वक्तव्यातून दिले.

### सोनम वांगचुक यांच्या आंदोलनावर तोडगा निघायला हवा:संजय शिरसाट यांचे मोठे विधान, रामरक्षा आंदोलनावरून उद्धव ठाकरेंनाही लगावला टोला

बातमी जगत | प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर1 :** दिल्लीत सुरू असलेल्या सोनम वांगचुक यांच्या उपोषणाला रविवारी 20 दिवस पूर्ण होत आहेत. त्यांची प्रकृती ढासळत असल्याने आता राज्याच्या राजकीय वर्तुळातूनही प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. शिवसेना (शिंदे गट) नेते आणि आमदार संजय शिरसाट यांनी आज (शुक्रवारी) पत्रकार परिषदेत बोलताना सोनम वांगचुक यांच्या आंदोलनावर तोडगा निघाला पाहिजे, अशी आपल्या पक्षाची अधिकृत भूमिका मांडली. याचबरोबर, त्यांनी उद्धव ठाकरे यांच्या 'रामरक्षा' आंदोलनावरूनही जोरदार टोलेबाजी केली. सोनम वांगचुक यांच्या सुरू असलेल्या उपोषणाबाबत बोलताना शिरसाट म्हणाले, "सोनम वांगचुक यांच्या उपोषणाचा आज 20वा दिवस असून त्यांची तब्येत खालावली आहे. उच्च न्यायालयानेही सरकारला काही सूचना दिल्या आहेत. या आंदोलनातून लवकरात लवकर काहीतरी सकारात्मक तोडगा निघाला पाहिजे, हीच आमच्या पक्षाची अधिकृत भूमिका आहे. केंद्राने यात हस्तक्षेप करून हे उपोषण थांबवावे, कारण त्यांची प्रकृती खराब होणे योग्य नाही." अयोध्येतील राम मंदिराच्या देणगीपेटीत झालेल्या कथित भ्रष्टाचाराच्या विरोधात उद्धव ठाकरे आज नागपुरात 'रामरक्षा पठण' आंदोलन करणार आहेत. यावर शिरसाट यांनी खोचक टीका केली. "उद्धव ठाकरेंना आता रामाची आणि हनुमानाची आठवण झाली आहे, ते भक्ती रसात लीन होत आहेत ही आनंदाची गोष्ट आहे, आमच्या त्यांना शुभेच्छा आहेत. मात्र, नवनीत राणांनी जेव्हा हनुमान चालिसा वाचण्याचा प्रयत्न केला होता, तेव्हा त्यांना तुरुंगात टाकले होते. हे सरकार त्यांच्या आरतीला अडवणार नाही, त्यांनी अत्यंत भक्तिभावाने आरती करावी," असा चिमटा त्यांनी काढला. तसेच, हे आंदोलन म्हणजे केवळ संजय राऊत यांचे फुकटचे सल्ले असल्याचा दावाही त्यांनी केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) नेते जयंत पाटील यांच्यात झालेल्या बैठकीबाबत शिरसाट म्हणाले की, जोपर्यंत उपमुख्यमंत्री किंवा जयंत पाटील स्वतः अधिकृत माहिती देत नाहीत, तोपर्यंत अफवांवर विश्वास ठेवू नये. मात्र, "पुढील आठ दिवसांत या चर्चांचा सारांश बाहेर येईल. मी केलेली भाकिते नेहमीच खरी ठरतात, त्यामुळे एक आठवडा वाट पाहा," असा राजकीय सस्पेन्स त्यांनी कायम ठेवला. ऑगस्ट महिन्याचा पंधरवडा उलटूनही मराठवाडा कोरडा असल्याने त्यांनी भीषण दुष्काळाची चिंता व्यक्त केली. "हवामान खात्याच्या अंदाजानुसार 23 तारखेनंतर तुरळक पाऊस पडण्याची शक्यता आहे. भविष्यातील भीषण दुष्काळाच्या शक्यतेवर राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा झाली असून, मुख्यमंत्र्यांनी आतापासूनच उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत," अशी माहिती त्यांनी दिली.

# नाव कमावणं कठीण, पण गमावणं क्षणाचं...! आयुष्यभराच्या प्रतिमेला एका चुकीची किंमत



प्रवीण बागडे
नागपूर, ९९२३६२०९१९

**"आयुष्यभर नाव कमावलं आणि म्हातारपणी गमावलं, अशी गत झाली ह्या माणसाची." हे वाक्य केवळ एका व्यक्तीच्या आयुष्याचं वर्णन नाही, तर सार्वजनिक जीवन जगणाऱ्या प्रत्येकासाठी एक गंभीर इशारा आहे. नेता, अधिकारी, साहित्यिक, कलाकार, समाजसेवक किंवा कोणतीही सार्वजनिक व्यक्ती असो, आयुष्यभराच्या कष्टाने निर्माण झालेली प्रतिमा, लोकांचा विश्वास आणि समाजाचा आदर एका चुकीच्या निर्णयामुळे क्षणार्धात कोसळू शकतो. प्रतिष्ठा उभारण्यासाठी अनेक दशके खर्ची पडतात, पण ती गमावण्यासाठी अनेकदा एकच चुकीचं पाऊल पुरेसं ठरतं. आज सामाजिक माध्यमांच्या युगात प्रत्येक व्यक्तीच न्यायाधीश झाली आहे. प्रत्येक कृतीचं विश्लेषण होतं, प्रत्येक विधानाचं परीक्षण होतं आणि प्रत्येक निर्णयावर लोकमत तयार होतं. त्यामुळे सार्वजनिक जीवनातील प्रत्येक शब्द आणि प्रत्येक कृती अधिक जबाबदारीने करावी लागते. आयुष्यभर जपलेली विश्वासार्हता शेवटच्या टप्प्यावर मलीन होऊ नये, यासाठी विवेक, संयम आणि नैतिकता हेच सर्वात मोठे आधारस्तंभ ठरतात.**



जीवनात यशस्वी होण्यासाठी केवळ बुद्धिमत्ता किंवा प्रतिभा पुरेशी नसते, तर त्यासाठी चारित्र्याची साथही तितकीच आवश्यक असते. पैसा, पद, सत्ता किंवा प्रसिद्धी माणसाला मोठं करत नाहीत, त्याच्या निर्णयातील प्रामाणिकपणा, मूल्यांप्रती असलेली निष्ठा आणि समाजाविषयीची जबाबदारी त्याचं खरं मोठेपण सिद्ध करतात. म्हणूनच इतिहासात अनेक व्यक्ती त्यांच्या कर्तृत्वाइतक्याच त्यांच्या अखेरच्या चुकीमुळेही लक्षात राहिल्या आहेत. म्हातारपण हे अनुभव, शहाणपण आणि मार्गदर्शनाचं वय मानलं जातं. या वयात समाजाला दिशा देण्याची अपेक्षा असते. परंतु जर याच टप्प्यावर अहंकार, स्वार्थ, सत्तेची लालसा किंवा चुकीच्या लोकांची संगत माणसाला भरकटवत असेल, तर त्याने आयुष्यभर कमावलेली विश्वासार्हता एका क्षणात धुळीस मिळते. म्हणूनच म्हणतात, "उतारवयातील संयम हा आयुष्यभराच्या कर्तृत्वाचा खरा रक्षक असतो." आज अनेक क्षेत्रांत अशी उदाहरणे पाहायला मिळतात. काही राजकारणी आयुष्यभर जनतेसाठी काम करतात; पण शेवटच्या काळात सत्तेच्या मोहापायी तत्त्वांशी तडजोड करतात. काही अधिकारी प्रामाणिक सेवेनंतर निवृत्तीच्या उंबरठ्यावर भ्रष्टाचाराच्या आरोपात अडकतात. काही साहित्यिक किंवा समाजसुधारक स्वतःच्या विचारांशी विसंगत भूमिका घेतात आणि त्यांच्या चाहत्यांचाच विश्वास गमावतात. समाज त्यांच्या आयुष्यभराच्या योगदानाचा विसर पडू देत नाही, मात्र त्यांच्या शेवटच्या चुकीची सावली त्यांच्या संपूर्ण कर्तृत्वावर पडते. चुका होणं मानवी स्वभावाचा भाग आहे. मात्र चूक मान्य करण्याचं धैर्य आणि स्वतःमध्ये सुधारणा करण्याची तयारी हेच खऱ्या मोठेपणाचं लक्षण आहे. प्रतिष्ठा टिकवायची असेल तर सतत आत्मपरीक्षण आवश्यक आहे. स्वतःभोवती केवळ स्तुती करणारी माणसं गोळा करणारा व्यक्ती वास्तवापासून दूर जातो. टीका स्वीकारण्याची वृत्ती आणि आवश्यक तेव्हा नम्रपणे माघार घेण्याची तयारीच दीर्घकाळ सन्मान टिकवून ठेवते. समाजानेही व्यक्तीचं मूल्यमापन करताना संतुलित भूमिका घ्यायला हवी. एका चुकीमुळे संपूर्ण आयुष्य नाकारण्याची घाई योग्य नाही. एखाद्या व्यक्तीच्या संपूर्ण योगदानाचा, परिस्थितीचा आणि भूमिकेचाही विचार व्हायला हवा. पण त्याचवेळी कोणतीही चूक केवळ व्यक्ती मोठी आहे म्हणून दुर्लक्षितही होता कामा नये. नैतिकतेचं माप सर्वांसाठी समान असलं पाहिजे. आजच्या तरुण पिढीनेही या वास्तवातून महत्त्वाचा धडा घ्यायला हवा. करिअर, पैसा आणि प्रसिद्धी मिळवणं आवश्यक आहे; पण त्याहून महत्त्वाचं म्हणजे विश्वास कमावणं. विश्वास हा बँकेतील ठेवीसारखा असतो, वर्षानुवर्षे जमा करावा लागतो पण एका चुकीच्या व्यवहाराने क्षणात संपतो. म्हणून प्रत्येक निर्णय घेताना त्याचा आपल्या प्रतिमेवर आणि भविष्यातील विश्वासावर काय परिणाम होईल, याचाही विचार व्हायला हवा. सार्वजनिक जीवनातील व्यक्तींनी विशेषतःलक्षात ठेवावं की त्यांचं प्रत्येक पाऊल समाजासाठी संदेश ठरत असतं. त्यांची वाणी, वर्तन आणि निर्णय यावर अनेकांची श्रद्धा असते. त्यामुळे वैयक्तिक लाभापेक्षा सार्वजनिक विश्वास अधिक मौल्यवान असतो. एकदा हा विश्वास तुटला, तर कोणतंही पद, कोणतीही सत्ता किंवा कोणतीही संपत्ती त्या नुकसानीची भरपाई करू शकत नाही. माणसाचं खरं यश त्याने किती संपत्ती कमावली यावर ठरत नाही, तर त्याने किती चांगल्या आठवणी मागे ठेवल्या, किती स्वच्छ प्रतिमा निर्माण केली आणि किती माणसं आपल्या कर्तृत्वाने जोडली यावर ठरतं. आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यावर लोकांनी "हा माणूस शेवटपर्यंत तत्त्वांशी प्रामाणिक राहिला," असं म्हणणं हीच सर्वात मोठी कमाई असते. आज समाजाला पदापेक्षा प्रामाणिकपणा, प्रसिद्धीपेक्षा विश्वास आणि यशापेक्षा चारित्र्य जपणारी माणसं हवी आहेत. कारण नाव कमावणं हे परिश्रमाचं फळ असतं, पण नाव टिकवणं ही आयुष्यभराची तपश्चर्या असते. प्रतिष्ठा हा मुकुट नसतो की हवा तसा घालता किंवा काढता येईल, ती आरशासारखी असते. एकदा तडा गेला की प्रतिबिंब कायमच बदलून जातं. काळ कोणालाही माफ करत नाही. तो प्रत्येकाच्या कर्तृत्वाची नोंद ठेवतो आणि प्रत्येक चुकीचाही हिशोब मांडतो. त्यामुळे आयुष्यभर जपलेली प्रतिमा शेवटच्या श्वासापर्यंत तितक्याच प्रामाणिकपणे जपावी लागते. इतिहास माणसाच्या संपत्तीची नव्हे, तर त्याच्या चारित्र्याची साक्ष देतो. सत्ता, संपत्ती आणि प्रसिद्धी क्षणभंगुर असतात, पण सचोटी, मूल्यनिष्ठा आणि समाजाच्या मनात निर्माण झालेला विश्वास हेच माणसाच्या आयुष्याचं खरं भांडवल असतं. आज प्रत्येक सार्वजनिक व्यक्तीने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहे. आपण पदासाठी जगतो आहोत की प्रतिष्ठेसाठी? कारण पद निवृत्तीनंतर संपतं, पण प्रतिष्ठा पिढ्यान्‌पिढ्या जिवंत राहते. आयुष्याच्या संध्याकाळी मागे वळून पाहताना संपत्तीपेक्षा सन्मान, पदापेक्षा प्रतिष्ठा आणि लोकप्रियतेपेक्षा लोकांचा विश्वासच अधिक मौल्यवान वाटतो. म्हणून प्रत्येक कृती, प्रत्येक निर्णय आणि प्रत्येक शब्द हा आपल्या चारित्र्याचा आरसा असला पाहिजे. शेवटी एकच "नाव कमावण्यासाठी आयुष्य खर्ची पडतं, पण नाव गमावण्यासाठी एक क्षण पुरेसा असतो. त्यामुळे कर्तृत्वापेक्षा चारित्र्य मोठं आणि प्रसिद्धीपेक्षा विश्वास अधिक मौल्यवान असतो. कारण इतिहास यशस्वी माणसांची नव्हे, तर विश्वासार्ह माणसांचीच कायम आठवण ठेवतो."

## पैशांच्या वादातून माय-लेकाची निर्घृण हत्या

बातमी जगत | प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** पैशांच्या व्यवहारातून 26 वर्षीय विवाहितेची गळा आवळून हत्या करून तिच्यासोबत असलेल्या अवघ्या 14 महिन्यांच्या निष्पाप मुलालाही वाहत्या पाण्यात फेकून दिल्याची अत्यंत धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील साजापूर येथील रहिवासी सायमा सलमान चौधरी हिचा मृतदेह नाशिक जिल्ह्यातील वावी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कनकोरी शिवारातील विहिरीत सापडला असून, तिच्या चिमुकल्या मुलाचा अद्याप शोध सुरू आहे. याप्रकरणी वावी पोलिसांनी दोघांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला असून, प्राथमिक चौकशीत पैशांच्या वादातून हे दुहेरी हत्याकांड घडल्याचे समोर आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, साजापूर येथील अब्दुल लतीफ युनूस चौधरी यांनी या प्रकरणी तक्रार दाखल केली होती. सायमा आणि तिचा 14 महिन्यांचा मुलगा बेपत्ता झाल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला. तपासादरम्यान सायमाच्या घरातून लाखो रुपयांच्या बँक व्यवहारांच्या पावत्या मिळाल्या. या व्यवहारांचा संबंध नातेवाईक नुरजमा अहमद चौधरी याच्याशी असल्याचे समोर आल्यानंतर पोलिसांनी त्याला आणि त्याचा मित्र सद्दाम ऊर्फ आमीर अहमद चौधरी यांना ताब्यात घेऊन चौकशी केली.

## राजर्षी शाहू महाराज आयुर्वेद महाविद्यालयाचा उत्कृष्ट निकाल; महाविद्यालयाच्या पहिल्याच बॅचचे बहुतांश विद्यार्थ्यांनी प्राप्त केले उत्तुंग यश

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ डॉ. भागवत वसे






**बुलढाणा :** स्थानिक द्वारका बहुउद्देशिय ग्रामीण विकास संस्थेच्या राजर्षी शाहू महाराज आयुर्वेद महाविद्यालचा उत्कृष्ट निकाल घोषित झाला असून, नुकताच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक द्वारा जाहीर झालेल्या निकालांनुसार बुलढाणा येथील राजर्षी शाहू महाराज आयुर्वेद महाविद्यालयाच्या प्रथम वर्ष आयुर्वेदाचार्य (बी.ए.एम.एस.) च्या पहिल्याच बॅचचा उत्कृष्ट निकाल लागला असून, महाविद्यालयाचे प्रथम वर्षाच्या एकूण ९८ विद्यार्थ्यांपैकी ७२ विद्यार्थी हे पुढील वर्षात प्रवेशित झाले आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक द्वारा नुकत्याच घोषित झालेल्या निकालानुसार महाविद्यालयाचे ५६ विद्यार्थी हे यशस्वीतेरित्या उत्तीर्ण झाले असून सोबतच उर्वरित १६ विदयार्थी सुद्धा द्वितीय वर्षात प्रवेशित झालेले आहेत. महाविद्यालयाच्या प्रथम बॅचच्याच विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे संस्थापक आदरणीय माजी आमदार श्री. ध्रुपदराव सावळे,अँड. कीर्तिताई सावळे-पऱ्हाड यांनी विदयार्थ्यांचे अभिनंदन केले असून त्यांना पुढील शैक्षणिक कालावधी करिता शुभेच्छा प्रदान केल्या. विद्यार्थ्यांच्या सदर दैदीप्यमान यशाबद्दल राजर्षी शाहू महाराज आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हर्षद केला, प्रशासकीय अधिकारी सत्यघोष बाहेकर, उपप्राचार्य डॉ. प्रितमसिंग ठाकूर, समस्त प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर व रुग्णालयीन कर्मचाऱ्यांनी विदयार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. महाविद्यालयाच्या पहिल्याच बॅचच्या विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या सदर उत्तुंग यशामागे त्यांची मेहनत, प्राध्यापकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, तसेच महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या दर्जेदार शैक्षणिक सुविधेचा मोठा वाटा असल्याचे महाविद्यालयीन प्रशासनाने स्पष्ट केले आहे. प्रविण्यप्राप्त विद्यार्थ्यांमध्ये प्रथम क्रमांक कु. गुंजन बापूराव ब्राम्हनकर व कु. मोमीन अदिबा अशपाक, द्वितीय क्रमांक कु. दिक्षा गणेश मुरूमकर तर तृतीय क्रमांक कु. पायल अभिमन्यू पवार यांनी प्राप्त केला आहे. आयुर्वेद शिक्षण क्षेत्रात गुणवत्तापूर्ण शिक्षण,अनुभवी प्राध्यापकवर्ग व आधुनिक सुविधांमुळेच विद्यार्थ्यांना सदर यश प्राप्त झाले आहे.

## अकोट काळंका माता मंदिर चोरी प्रकरणाचा यशस्वी तपास; एलसीबी पथकाचा पोलीस महासंचालकांकडून विशेष सन्मान

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ संदीप पळसकर



**अकोला :** अकोट येथील प्रसिद्ध काळंका माता मंदिरातील लाखो रुपयांच्या चोरीचा यशस्वी तपास करून आरोपीला जेरबंद करणाऱ्या अकोला स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाचा महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

२२ फेब्रुवारी २०२६ रोजी अकोट येथील काळंका माता मंदिरात अज्ञात चोरट्याने देवीच्या मूर्तीवरील सुमारे ४८ ग्रॅम सोन्याचे दागिने, ७५० ग्रॅम चांदी तसेच दानपेटीतील रोख रक्कम असा एकूण सुमारे ४ लाख ७५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला होता. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली होती. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने तांत्रिक विश्लेषण (Technical Analysis) आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपासाची चक्रे फिरवली. तपासादरम्यान आरोपी अमोल काशीराम तेलगोटे (रा. रिधोरा, ता. बाळापूर, जि. अकोला) याचा शोध घेऊन त्याला अमरावतीजवळ अटक करण्यात आली. आरोपीकडून चोरीतील सोन्या-चांदीचे दागिने, मोबाईल, गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल व इतर साहित्य असा सुमारे ७.२१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या संवेदनशील आणि गाजलेल्या गुन्ह्याचा अत्यंत कौशल्याने उलगडा केल्याबद्दल महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक यांनी तपास पथकातील तत्कालीन पोलीस निरीक्षक शंकर शेळके, पोलीस उपनिरीक्षक विष्णू बोडखे, पोलीस हेडकॉन्स्टेबल सुलतान पठाण आणि वसीमोद्दीन यांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला.

या उल्लेखनीय कामगिरीमुळे अकोला स्थानिक गुन्हे शाखेचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून, पोलिसांच्या दक्ष व प्रभावी तपासकार्याचे कौतुक केले जात आहे.

बातमीजगत हे पत्र मालक, प्रकाशक, कैलास हरीभाऊ राऊत यांनी मुद्रक श्रीकृपा प्रिंटर्स, मुद्रण स्थळ जपान जिन जवळ, दगडी पुल, अकोला जि. अकोला 444002 (M. S. ) येथून मुद्रित करून -कार्यालय : बातमीजगत कार्यालय, देऊळगाव माळी ता. मेहकर जि. बुलडाणा (M. S. ) येथून प्रकाशित केले. संपादकः कैलास हरीभाऊ राऊत मो. 9561596693 प्रकाशित लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार राहतीलच असे नाही. ) सर्व वाद विवाद मेहकर न्यायालयांतर्गत राहील. ) RNI No . MHBIL/25/A1435

This newspaper is printed by the owner, publisher, Kailas Haribhau Raut, printer Shrikripa Printers, printing place near Japan Jin, Dagdi Pul, Akola Dist. Akola 444002 (M. S. ) and published from -Office: News Jagat Office, Deulgaon Mali Tal. Mehkar Dist. Buldana (M. S. ). Editor: Kailas Haribhau Raut Md. 9561596693 The editor does not necessarily agree with the published articles and news. (The editor is not necessarily responsible according to the P. R. B. Act. ) All disputes will be subject to Mehkar Court. ) RNI No. MHBIL/25/A1435

## घटना-घडामोडी

### सरकार इतकं असंवेदनशील का?:सोनम वांगचुक यांच्या भेटीनंतर सुप्रिया सुळेंचा सवाल, संसदेत सरकारला घेरण्याचा इशारा

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**मुंबई/ दिल्ली :** दिल्लीतील जंतरमंतर येथे सुरू असलेल्या सोनम वांगचुक यांच्या उपोषणाला रविवारी २० दिवस पूर्ण होत आहेत. त्यांच्या ढासळत्या प्रकृतीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या नेत्या आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रत्यक्ष आंदोलनस्थळी जाऊन वांगचुक यांची भेट घेतली. यावेळी सुप्रिया सुळे यांनी अत्यंत आक्रमक पवित्रा घेत केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. आगामी २० तारखेला संसदेचे कामकाज सुरू होताच, आम्ही केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरणार असल्याचे सुळे यांनी यावेळी स्पष्ट केले. त्यांच्या या घोषणेमुळे आगामी अधिवेशनात विरोधक आक्रमक राहतील, हे स्पष्ट झाले आहे. सोनम वांगचुक यांच्या भेटीनंतर संवाद साधताना सुप्रिया सुळे यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना थेट लक्ष्य केले. सध्या देशात सुरू असलेल्या शिक्षण विभागातील गोंधळाच्या आणि विविध प्रलंबित प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर सुप्रिया सुळे यांनी ही अत्यंत मोठी मागणी केली आहे. त्या म्हणाल्या की, "आगामी २० तारखेला जेव्हा संसदेचे सत्र सुरू होईल, तेव्हा आम्ही हा संपूर्ण मुद्दा अत्यंत ताकदीने सभागृहात मांडू. या सर्व प्रश्नांना जबाबदार धरून आम्ही केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तत्काळ राजीनामा द्यावा, अशी आग्रही मागणी संसदेत करणार आहोत." सोनम वांगचुक सलग २० दिवस उपोषणाला बसले असताना आणि त्यांची प्रकृती चिंताजनक पातळीवर पोहोचली असतानाही सरकारने घेतलेल्या भूमिकेवर सुळे यांनी तीव्र संताप व्यक्त केला. "हे केंद्र सरकार अतिशय असंवेदनशील आणि बधिर आहे. देशातील एक महत्त्वाचा व्यक्ती २० दिवस अन्नत्याग करून बसला आहे, मात्र सरकारच्या कोणत्याही प्रतिनिधीने त्यांच्याशी संवाद साधण्याची तसदी घेतलेली नाही. लोकशाहीत सरकारने किमान चर्चेसाठी तरी पुढे यायला हवे होते, पण त्यांनी जाणीवपूर्वक या आंदोलनाकडे पाठ फिरवली आहे," अशा शब्दांत सुप्रिया सुळेंनी सरकारच्या कार्यपद्धतीचा खरपूस समाचार घेतला. वांगचुक यांची खालावलेली प्रकृती पाहता सुप्रिया सुळे यांनी त्यांना आपले हे उपोषण मागे घेण्याची विनंती केली आहे. "तुमचा जीव आमच्यासाठी आणि देशासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे, त्यामुळे तुम्ही उपोषण सोडावे," अशी विनंती केली. तसेच, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष आणि संपूर्ण 'इंडिया' आघाडी सोनम वांगचुक यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी असून हा लढा आपण एकत्रितपणे संसदेत लढू, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. सोनम वांगचुक यांच्या मागण्या आणि सध्याच्या शिक्षण व्यवस्थेतील गंभीर विषय या दोन्ही मुद्यांवर भारत सरकारने आता तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी सुप्रिया सुळे यांनी केली आहे. वांगचुक यांच्या आंदोलनाकडे दुर्लक्ष करणे सरकारला महागात पडू शकते, असा इशारा देत 'इंडिया' आघाडी आता या विषयावरून रस्त्यापासून ते संसदेपर्यंत आवाज उठवणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### अकोला-बडनेरा रेल्वेत छेडछाडीचा प्रकार:तरुणीने आरोपी तरुणाला बांगड्या भरवल्या, पावडर-लिपस्टिक लावत शिकवला धडा -

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**अकोला :** अकोला-बडनेरा रेल्वेत छेड काढणाऱ्या एका तरुणाला तरुणीने 'गांधीगिरी' स्टाईलने चांगलाच धडा शिकवला. या धाडसी तरुणीने रेल्वे डब्यातच या रोड रोमियोच्या हातात चक्क बांगड्या भरल्या आणि त्याच्या ओठांवर लिपस्टिक लावली. या अनोख्या शिक्षेचा आणि तरुणीच्या धाडसाचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. शेगाववरून बडनेराकडे येणाऱ्या 'भुसावळ-वर्धा' ट्रेनमध्ये हा संतापजनक प्रकार घडला. गाडीत प्रवाशांची मोठी गर्दी असताना एका तरुणाने जाणीवपूर्वक एका तरुणीची छेड काढण्यास सुरुवात केली. सहसा अशा प्रसंगी महिला घाबरून गप्प बसतात, पण या तरुणीने तसे न करता प्रवाशांच्या मदतीने थेट त्याला जागेवरच जाब विचारला. नेहमीप्रमाणे छेड काढणाऱ्याला केवळ चोप न देता, या तरुणीने त्याला आगळ्यावेगळ्या पद्धतीने त्याची जागा दाखवून दिली. तिने स्वतःच्या हातातील बांगड्या काढल्या आणि त्या तरुणाच्या हातात भरवल्या. एवढ्यावरच न थांबता, तिने त्याच्या गालावर आणि ओठांवर लाली (लिपस्टिक) लावून त्याचा प्रवासात 'मेकअप' केला. आतापर्यंत महिलांची छेड काढणाऱ्यांना मारहाण झाल्याचे अनेक व्हिडीओ समोर आले आहेत. मात्र, या तरुणीने ज्या अनोख्या पद्धतीने या तरुणाची धिंड काढली, त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. डब्यातील प्रवाशांनी काढलेला या घटनेचा व्हिडीओ आता इंटरनेटवर व्हायरल झाला असून महिलांच्या धाडसाला सलाम केला जात आहे.

## पान एक वरून

सुमारे तीन आठवड्यांपासून सुरू असलेल्या सोनम वांगचुक यांच्या आमरण उपोषणादरम्यान, आमिर खानने पहिल्यांदाच या मुद्द्यावर मौन सोडले आहे. दीर्घकाळापासून सोशल मीडियावर त्यांच्या मौनाबद्दल प्रश्न विचारले जात होते. आता आमिरने म्हटले आहे की त्यांना सोनम वांगचुक यांच्या तब्येतीची चिंता आहे आणि ते लवकरच आपले उपोषण संपवतील अशी त्यांना आशा आहे. पण त्याचबरोबर आमिरने असेही म्हटले आहे की '3 इडियट्स' हा चित्रपट सोनम वांगचुक यांच्यावर आधारित नाही. लंडन इंडियन फिल्म फेस्टिव्हलमध्ये 'लगान' चित्रपटाच्या प्रदर्शनादरम्यान, आमिर खानला सोनम वांगचुक यांच्याबद्दल एका महिलेने विचारले, 'आम्ही मोठे होत असताना, आमच्यावर तुमचा खूप प्रभाव होता. तुम्हीही सोनम वांगचुक यांच्यापासून प्रेरित झाला आहात का?' यावर आमिरने मध्येच थांबवत म्हटले, 'नाही, ही एक चुकीची समजूत आहे. जेव्हा चित्रपट बनत होता, तेव्हा मी सोनमला ओळखतही नव्हतो. मी नुकताच चतुरचा (3 इडियट्समधील अभिनेता ओमी वैद) व्हिडिओ पाहिला, पण तो चुकीचा आहे.

✦ आमदार संजयभाऊ गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती

# एकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीची बैठक उत्साहात संपन्न

✦ डॉ. भागवत वसे

बुलढाणा : विविध आरोग्यविषयक योजना राबविणे, नागरिकांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, माता-बाल आरोग्य, संसर्गजन्य व असंसर्गजन्य रोग नियंत्रण, पोषण, स्वच्छता तसेच शासनाच्या विविध आरोग्य कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत स्थापित झालेल्या एकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीची बैठक नुकतीच

१७ जुलै रोजी बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार संजयभाऊ गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. बैठकीस समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते.





यावेळी संबंधित विभागांच्या प्रतिनिधींनी आपापल्या कार्याचा आढावा समितीसमोर सविस्तरपणे सादर केला तसेच विविध विषयांवर अत्यावश्यक सूचना व मार्गदर्शन यावेळी करण्यात आले. सदर महत्वपूर्ण बैठकीत प्राथमिक आरोग्य केंद्र वरवंड-चांडोळ येथील अतिक्रमण तातडीने हटविण्याबाबत आमदार संजयभाऊ गायकवाड यांनी संबंधित विभागांना आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. याव्यतिरिक्त प्राथमिक आरोग्य केंद्र हातडी-पाडळी येथील पाणीटंचाईच्या समस्येवर सुद्धा सविस्तर चर्चा करून तात्काळ उपाययोजना राबविण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्यात आले. याशिवाय प्राथमिक आरोग्य केंद्रांवरील डिझेल बिलांची स्पर्श प्रणालीअंतर्गत मंजुरी बाबत होत असलेल्या विलंबाबाबत चर्चा करण्यात आली असून त्या अनुषंगाने डिझेल खर्चासाठी आगाऊ निधी उपलब्ध करून देण्याबाबत आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना माननीय आमदार महोदयांनी संबंधित यंत्रणेला दिल्या. यावेळी सदर बैठकीस जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बी. ए. मोहन, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. भागवत भुसारी, महिला व बाल विकास अधिकारी प्रवीण येंडोले, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. निलेश जाधव, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. महेंद्र सरपाते, तहसीलदार विठ्ठल कुंमरे, गटविकास अधिकारी डॉ. अमिता पवार, बाल विकास प्रकल्प अधिकारी संदीप गवळी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व समिती सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी आमदार महोदयांनी विविध विभागांमध्ये समन्वय राखून आरोग्यविषयक उपक्रम प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना उपस्थितांना दिल्या. तसेच नागरिकांच्या आरोग्यविषयक समस्या तत्परतेने सोडवून आरोग्य सेवांची गुणवत्ता अधिक सक्षम करण्यावर भर देण्याचे आवाहन सुद्धा यावेळी करण्यात आले.

## बियाणे वाटपावरून संशयाचे सावट; चौकशीची मागणी

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ शिवाजी वायाळ

**सिंदखेडराजा :** तालुक्यात सन २०२६ मध्ये झालेल्या विविध बियाणे वितरण प्रक्रियेची सखोल चौकशी करण्याची मागणी उपविभागीय अधिकारी, सिंदखेडराजा यांच्याकडे करण्यात आली आहे. बियाणे वाटपातील नोंदी, लाभार्थी यादी आणि वितरण प्रक्रियेची पारदर्शकता तपासण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

श्रीमंत राजे लखुजीराव जाधवराव गड किल्ले ऐतिहासिक वास्तू संवर्धन प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्रीकृष्ण राजे जाधव यांनी १७ जुलै रोजी एसडीओंकडे निवेदन सादर केले. सोयाबीन, उडीद, मूग, मका, तूर मिनीकिट तसेच कपाशी बियाण्यांच्या वितरण प्रक्रियेची स्वतंत्र चौकशी करून संबंधित अभिलेख तपासण्याची मागणी त्यांनी केली आहे. निवेदनात काही बियाण्यांचे वितरण तालुका कृषी कार्यालयामार्फत, तर काहींचे वितरण आनंद कृषी केंद्र, शेंदूरजन तसेच कृषी क्रांती कृषी केंद्र, देऊळगाव राजा यांच्या माध्यमातून करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. लाभार्थी यादी, स्टॉक रजिस्टर, वितरण नोंदी, प्राप्ती-वितरण कागदपत्रे तसेच इतर अभिलेखांची तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. लाभार्थ्यांना प्रत्यक्ष बियाणे मिळाले का, पात्र शेतकऱ्यांनाच योजनेचा लाभ मिळाला का, याची क्षेत्रीय पातळीवर पडताळणी करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. चौकशीत कोणत्याही प्रकारची अनियमितता आढळल्यास संबंधित अधिकारी, कर्मचारी, कृषी केंद्र किंवा जबाबदार व्यक्तींवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

## खारपाडा टोल नाक्यावरील टोल वसुली बंद करा कृषी सभापती वैकुंठ पाटील यांची आ. निरंजन डावखरे यांच्याकडे मागणी

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ किरण बांधणकर

**पेण :** मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम अद्याप पूर्ण झालेले नसतानाही रायगड जिल्ह्यातील खारपाडा (ता. पेण) येथील टोल नाक्यावर सुरू करण्यात आलेली टोल वसुली तातडीने बंद करण्यात यावी, अशी आग्रही मागणी रायगड जिल्हा परिषदेचे कृषी, पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सभापती वैकुंठ रवींद्र पाटील यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी कोकण विभाग पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे यांना लेखी पत्र पाठवून शासन स्तरावर तातडीने

**✦ मुंबई-गोवा महामार्गावरील खारपाडा (ता. पेण) येथील टोल वसुली पूर्णपणे बेकायदेशीर आणि प्रवाशांना वेठीस धरणारी असल्याने, जोपर्यंत महामार्गाचे काम शंभर टक्के पूर्ण होत नाही, तोपर्यंत ही टोल आकारणी थांबवण्यासाठी शासन स्तरावर तातडीने प्रयत्न व्हावेत, अशी मुख्य मागणी यात करण्यात आली आहे. या प्रकरणी आता आमदार निरंजन डावखरे शासन दरबारी काय भूमिका घेतात आणि खारपाडा टोल नाक्यावरील वसुलीला तात्पुरती स्थगिती मिळते का, याकडे संपूर्ण रायगड जिल्ह्यातील वाहनचालकांचे लक्ष लागले आहे.**

प्रयत्न करण्याची विनंती केली आहे. खारपाडा येथील टोल नाक्यावर सध्या सुरू असलेली टोल आकारणी ही वाहनचालक आणि सामान्य जनतेवर अन्याय करणारी असल्याचे त्यांनी आपल्या पत्रात स्पष्ट केले आहे.

सभापती वैकुंठ पाटील यांनी मुंबई गोवा महामार्गाच्या सद्यस्थितीवर बोट ठेवले आहे. महामार्गाचे काम अद्याप अनेक ठिकाणी प्रलंबित आणि अपूर्ण अवस्थेत आहे. असे असतानाही पेण तालुक्यातील खारपाडा टोल नाक्यावर प्रशासनाकडून टोल वसुली सुरू करण्यात आली आहे. रस्ता पूर्ण तयार नसतानाही नागरिकांकडून सक्तीने टोल वसूल केला जात असल्याने प्रवाशांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. महामार्गाचे काम पूर्ण झाल्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत खारपाडा टोल नाक्यावर टोल आकारणी करण्यात येऊ नये. या गंभीर प्रश्नावर आपण वैयक्तिक लक्ष घालून शासन स्तरावर तातडीने आवश्यक तो पाठपुरावा करावा आणि ही टोल वसुली थांबवून जनतेला दिलासा द्यावा, अशी नम्र विनंती वैकुंठ पाटील यांनी आमदार डावखरे यांना केली आहे.

## मतदार यादी विशेष पुनर्निरीक्षण मोहिमेला गती; काँग्रेसची प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ सैय्यद इमरान

**मालेगांव :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात येत असलेल्या मतदार यादी विशेष सखोल पुनर्निरीक्षण कार्यक्रम–२०२६ अंतर्गत काँग्रेस पक्षाच्या बी.एल.ए.-२ पदाधिकारी व कार्यकर्त्यांसाठी आयोजित प्रशिक्षण कार्यशाळा गुरुवारी रिसोड व मालेगाव तालुक्यात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

या कार्यशाळेत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव अक्षय राऊत यांनी उपस्थित बी.एल.ए.-२ पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मतदार यादी विशेष सखोल पुनर्निरीक्षण मोहिमेचे महत्त्व पटवून



देत सविस्तर मार्गदर्शन केले. मतदार नोंदणी, नावातील दुरुस्ती, नवीन मतदारांचा समावेश, मृत अथवा स्थलांतरित मतदारांची नावे वगळण्याची प्रक्रिया तसेच मतदार यादी अधिक अचूक व अद्ययावत करण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबींवर त्यांनी सखोल माहिती दिली. प्रत्येक बी.एल.ए.ने आपल्या कार्यक्षेत्रात दक्षतेने काम करून पात्र नागरिकांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी सक्रिय भूमिका बजावावी, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यशाळेला आमदार अमित सुभाषराव झनक, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजूभाऊ चौधरी, दिलीपरावजी सरनाईक यांच्यासह रिसोड व मालेगाव तालुक्यातील काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, बी.एल.ए.-२ आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संचालन प्रवीण पाटील सर यांनी केले तर आभार प्रदर्शन तालुका अध्यक्ष संदीप राव घुगे यांनी केले प्रशिक्षणादरम्यान मतदार यादी पुनर्निरीक्षणाशी संबंधित विविध शंकांचे निरसन करण्यात आले असून, आगामी मोहिम प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

## नवनियुक्त गटविकास अधिकारी मितेश पाटील यांचा शिवसेनेकडून सत्कार

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ सैय्यद इमरान

**मालेगांव :** पंचायत समितीचे नवनियुक्त गटविकास अधिकारी मितेश पाटील यांचा शिवसेना (मालेगाव तालुका)च्या वतीने पंचायत समिती कार्यालयात शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी तालुकाप्रमुख प्रदीप कुटे यांनी त्यांचे अभिनंदन करून भावी कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. याप्रसंगी तालुक्यातील विविध विकासकामांबाबत चर्चा करण्यात आली.

विशेषतः प्रधानमंत्री आवास (घरकुल) योजना, व्हिलेज बिझनेस ग्रोथ (VBG) तसेच विकसित भारत अभियान यांसारख्या




महत्त्वाच्या शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून त्याचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याची अपेक्षा शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. यावेळी शिवसेनेच्या वतीने तसेच पक्षाच्या नेत्या आमदार भावना गवळी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील विकासकामांसाठी आणि विविध शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासन देण्यात आले. या प्रसंगी उपतालुकाप्रमुख सुधाकरराव धोंगडे, उपतालुकाप्रमुख माणिकराव आदमने, गजाननराव गरड तसेच शिवसेनेचे पदाधिकारी, शिवसैनिक आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## माहूरच्या रेणुका माता 'तांबुल' प्रसादाला GI मानांकन: तिरुपती लाडूनंतर देशात दुसरा, तर महाराष्ट्रातील पहिलाच बहुमान

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**नांदेड :** महाराष्ट्राच्या समृद्ध धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेला राष्ट्रीय स्तरावर एक अत्यंत अभिमानास्पद आणि ऐतिहासिक ओळख मिळाली आहे. साडेतीन शक्तीपीठांपैकी प्रमुख मूळ पीठ असलेल्या तीर्थक्षेत्र माहूर गडावरील श्री रेणुका माता मंदिरामध्ये देवीला अर्पण केल्या जाणाऱ्या पारंपरिक 'रेणुका माता तांबुल' या पवित्र प्रसादाला केंद्र सरकारने अधिकृत भौगोलिक मानांकन (GI Tag) बहाल केले आहे.

या ऐतिहासिक निर्णयामुळे, आंध्र प्रदेशातील जगप्रसिद्ध 'तिरुपती लाडू'नंतर देशात जीआय (GI) मानांकन मिळवणारा माहूरचा तांबुल हा दुसराच धार्मिक प्रसाद ठरला आहे, तर महाराष्ट्रातील हा अशा प्रकारचा पहिलाच प्रसाद आहे. या बहुमानामुळे माहूरच्या धार्मिक पर्यटनाला आता जागतिक नकाशावर एक नवी झळाळी मिळणार आहे. माहूरच्या या तांबुल प्रसादाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे पूर्णपणे नैसर्गिक आणि औषधी स्वरूप. हा प्रसाद तयार करण्यासाठी कोणत्याही कृत्रिम घटकांचा वापर केला जात नाही. यामध्ये नागवेलीची पाने, कात, चुना आणि सुपारी, सोप, लवंग, वेलची, ओवा आणि धनेदाळ, जायफळ, जायपत्री, आस्मान तारा, ज्येष्ठमध आणि चमनबार या १४ नैसर्गिक व औषधी घटकांचा समावेश असतो. हे सर्व १४ साहित्य एकत्र करून आजही पारंपरिक पद्धतीने दगडी खलबत्त्यात कुटून हा तांबुल तयार केला जातो. आयुर्वेदाच्या दृष्टीने हा तांबुल केवळ धार्मिक प्रसाद नसून पचनक्रिया सुधारणारा आणि मानवी आरोग्यासाठी अत्यंत गुणकारी असा औषधी अर्क मानला जातो. हा राष्ट्रीय बहुमान मिळवणे सोपे नव्हते. तांबुलाचा प्राचीन इतिहास, त्याचा सांस्कृतिक संदर्भ, भौगोलिक वैशिष्ट्ये आणि त्याची अस्सल ओळख सिद्ध करणारे शेकडो पानांचे पुरावे केंद्र सरकारकडे सादर करण्यात आले होते. जवळपास तीन वर्षांच्या सातत्यपूर्ण आणि कायदेशीर पाठपुराव्यानंतर हे यश मिळाले आहे. या संपूर्ण प्रक्रियेत देशातील प्रसिद्ध भौगोलिक मानांकन तज्ज्ञ प्रा. डॉ. गणेश हिंगमिरे यांचे महत्त्वपूर्ण तांत्रिक व कायदेशीर मार्गदर्शन लाभले. तसेच, रेणुका माता संस्थानचे अधिकृत विश्वस्त चंद्रकांत भोपी, समीर भोपी आणि सेवेकरी मंडळाने यासाठी विशेष परिश्रम घेतले. या मानांकनामुळे आता बाजारातील बनावट उत्पादनांना चाप बसणार असून स्थानिक रोजगाराला मोठी चालना मिळणार आहे. लोकपरंपरेनुसार आणि प्राचीन ग्रंथांमधील उल्लेखांनुसार, श्री रेणुका माता यांनी त्यांचे निस्सीम भक्त श्री विष्णुकवी महाराजांना स्वप्नात दृष्टांत देऊन तांबुलाचा नैवेद्य अर्पण करण्याची दैवी आज्ञा दिली होती. हा प्राचीन वारसा आजही तितक्याच पवित्रतेने सुरू असून मंदिरामध्ये दररोज सकाळपासून रात्रीपर्यंत तांबुल तयार करण्याचे कार्य चालते. सध्या गावातील अमोल गावंडे, पांडुरंग राठोड, विशाल चौधरी, संतोष परळकर, अनिल परळकर, अभिषेक परळकर आणि लवकुश जाधव ही सात पारंपरिक सेवेकरी कुटुंबे कोणत्याही व्यावसायिक फायद्याची अपेक्षा न ठेवता, हा दैवी वारसा पिढ्यानपिढ्या जपण्याचे अत्यंत पवित्र कार्य करत आहेत. वर्ल्ड इंटलॅक्चुअल प्रॉपर्टी ऑर्गनाइजेशननुसार, जीआय टॅग एकप्रकारचा लेबल आहे. जो कोणत्याही उत्पादनाच्या भौगोलिक ओळखीच्या रुपात दिला जातो. हा टॅग एखाद्या खास मॅन्युफॅक्चर्ड प्रॉडक्टला किंवा कोणत्याही खास पिकाला किंवा नैसर्गिक उत्पादनाला दिला जातो. त्याची नोंद सरकार दरबारी घेतली जाते.

## घटना-घडामोडी



### सारंगपूर ग्रामपंचायत चौकशीत घोळ? आंदोलकाचा आत्मदहनाचा इशारा

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ समाधान पदमने

**मेहकर :** तालुक्यातील सारंगपूर ग्रामपंचायतीमधील कथित भ्रष्टाचाराच्या चौकशीवरून नवा वाद निर्माण झाला आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही संबंधित अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायतीचे रेकॉर्ड सील न करता संशयित आरोपींना पाठीशी घातल्याचा आरोप तक्रारकर्ते गजानन माधव बोरकर यांनी केला आहे. या प्रकरणी आगामी ७ दिवसांत निष्पक्ष चौकशी करून न्याय न मिळाल्यास थेट आत्मदहन करण्याचा इशारा बोरकर यांनी प्रशासनाला दिला आहे. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार (क्र. २५०/२०२६) सारंगपूर ग्रामपंचायतीचे अभिलेख तात्काळ जप्त करणे आवश्यक होते. मात्र, मेहकर येथील विस्तार अधिकाऱ्यांनी सरपंच आणि ग्रामसेवकांशी संगनमत करून रेकॉर्ड सील करण्याची कारवाई टाळली. परिणामी, संशयितांना कागदपत्रांमध्ये फेरफार करण्याची संधी मिळाली, असा आरोप बोरकर यांनी केला आहे. तसेच १६ जुलै रोजी झालेल्या चौकशी दरम्यान चौकशी समितीचे अध्यक्ष श्री. जे. एम. पोफळे यांनी व्हिडिओ रेकॉर्डिंगला मज्जाव करत सरपंचांनाच सोबत बसवून घेतल्याने संपूर्ण प्रक्रियेवर संशय व्यक्त केला जात आहे. या प्रकरणात चौकशी समिती अध्यक्ष, बीडीओ, सरपंच आणि ग्रामसेवक यांच्या मोबाईलचे सीडीआर आणि लोकेशन तपासण्यात यावे, अशी मागणी तक्रारकर्त्यांनी केली आहे. प्रशासनाने या गंभीर प्रकरणाकडे दुर्लक्ष केल्यास तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असे निवेदनात म्हटले आहे. या इशाऱ्यामुळे जिल्हा प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे.

✦ :रामरक्षा आंदोलनावरून नवनीत राणांची टीका, 18 जुलैला करणार हनुमान चालीसा पठण

# जनाब उद्धव ठाकरे रामरक्षा नव्हे, पक्षरक्षा करत आहेत

बातमी जगत | प्रतिनिधी

**अमरावती :** अयोध्येतील राम मंदिराच्या देणगी पेटीत झालेल्या कथित चोरीच्या प्रकरणावरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आता नागपुरात १८ जुलै रोजी 'रामरक्षा पठण' आंदोलन करणार आहेत. या आंदोलनावरून भाजप नेत्या आणि माजी खासदार नवनीत राणा यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर अत्यंत आक्रमक शब्दांत टीका केली आहे. अमरावती येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना राणा यांनी उद्धव ठाकरेंचा उल्लेख 'जनाब उद्धव ठाकरे' असा करत त्यांना थेट अयोध्येचे दर्शन आणि हनुमान चालिसा प्रकरणाची आठवण करून दिली.



"जेव्हा अयोध्येत रामलल्लाचे भव्य मंदिर उभे राहिले आणि देश-विदेशातून भक्त तिथे गेले, तेव्हा 'जनाब' उद्धव ठाकरे कुठे लपले होते?" असा बोचरा सवाल राणा यांनी केला. "पक्ष बरबाद झाल्यानंतर, आमदार आणि खासदार सोडून गेल्यानंतर आता त्यांना रामलल्लाची आणि रामरक्षेची आठवण आली आहे. जे कधी दर्शनालाही गेले नाहीत, ते रामरक्षा काय करणार? ते रामरक्षा करत नाहीत, तर उरलेल्या पक्षाची 'पक्षरक्षा' करत आहेत," असा सणसणीत टोला नवनीत राणा यांनी लगावला.

आपल्याला झालेल्या अटकेची आठवण करून देत राणा म्हणाल्या, "मी जेव्हा हनुमान चालिसा वाचण्याची परवानगी मागितली, तेव्हा जनाब उद्धव ठाकरेंच्या अहंकारामुळे मला 14 दिवस जेलमध्ये राहावे लागले. पण आज तेच जय श्रीरामचे नारे देत आहेत. माझी त्यांना विनंती आहे की, नागपूरवरून 150 किलोमीटर दूर अमरावतीला आमच्या हनुमानगढीवर या, आम्ही तुमचे स्वागत करू आणि सोबत बसून हनुमान चालिसाचे पठण करू." नागपूरमध्ये रामरक्षा करण्यापूर्वी उद्धव ठाकरेंनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयात जाऊन दर्शन घ्यावे आणि नतमस्तक व्हावे, असा खोचक सल्ला नवनीत राणा यांनी दिला. तसेच, "तुमच्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आमच्यासारखा देशद्रोह किंवा राजद्रोह लावणार नाहीत. ते स्वागत करायला तयार आहेत," असेही त्या म्हणाल्या.

श्रीकृष्ण दिवसातून पाच वेळा नमाज पठण करत होते, या एका मौलानाच्या वादग्रस्त वक्तव्यावर राणा यांनी तीव्र संताप व्यक्त केला. "हा कुठून आलेला मौलाना आहे मला माहीत नाही. हिंदू धर्म हा हजारो वर्षे जुना आहे. आम्ही कृष्णाला कायम मोठा टिळा (तिलक) लावून पाहिले आहे. त्यामुळे या मौलानाने आधी माथ्यावर मोठा टिळा लावून नमाज पठण करावे आणि मगच आमच्या भगवंतावर बोलण्याची लायकी ठेवावी," असे सडेतोड उत्तर त्यांनी दिले. राम मंदिरातील चोरीच्या प्रकरणावर बोलताना त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर पूर्ण विश्वास व्यक्त केला.

"ज्या काँग्रेसने राम मंदिर होऊ दिले नाही, त्यांना यावर बोलण्याचा अधिकार नाही. देशाच्या चौकीदारावर (पंतप्रधानांवर) माझा पूर्ण भरोसा आहे. 'ना खाऊंगा ना खाने दुंगा' हे त्यांचे धोरण आहे. जर कुणी राम मंदिरात डाका टाकला असेल, तर त्याला कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही," असा विश्वास राणा यांनी व्यक्त केला. लाडक्या बहिणींची 'मोफत साडी योजना' बंद केल्याच्या प्रश्नावर त्या म्हणाल्या, "सरकारने शेतकऱ्यांची कर्जमाफी, लाडकी बहीण आणि निराधार योजनांचा निधी वाढवण्याचे काम केले आहे. काही तांत्रिक अडचणींमुळे साडी योजना बंद झाली असेल, पण हे सरकार नेहमी महिला आणि शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे."

## भाजपकडून तुकाराम भाकरे यांची शहापूर ग्रामीण पूर्व मंडळाध्यक्षपदी नियुक्ती

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ वसंत पानसरे

**ठाणे :** भारतीय जनता पक्ष, ठाणे जिल्हा ग्रामीणच्या वतीने शहापूर तालुक्यातील ग्रामीण पूर्व मंडळाध्यक्षपदी तुकाराम रामचंद्र भाकरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजप ठाणे जिल्हा ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र शाम डाकी यांनी नियुक्तीपत्र देऊन त्यांचे अभिनंदन केले.

आगामी काळात पक्षसंघटना अधिक मजबूत करण्यासाठी तसेच शहापूर तालुक्यातील ग्रामीण भागात भाजपचा जनाधार वाढविण्यासाठी तुकाराम भाकरे यांनी सक्रियपणे काम करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.





तुकाराम भाकरे हे अनेक वर्षांपासून राजकीय व सामाजिक क्षेत्रात सक्रिय असून, त्यांच्या अनुभवाचा पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी निश्चितच फायदा होईल, असा विश्वास जिल्हाध्यक्ष जितेंद्र डाकी यांनी व्यक्त केला आहे. या नियुक्तीनंतर तुकाराम भाकरे यांच्यावर विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, शहापूर तालुक्यातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## वर्धा अत्याचार आणि हत्या प्रकरणी आरोपीला तात्काळ फासावर लटकवा!

बातमी जगत | प्रतिनिधी

**वर्धा :** वर्धा जिल्ह्यात एका 12 वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करून तिची अत्यंत निर्घृणपणे हत्या करण्यात आल्याच्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या नराधमाला कठोरात कठोर शिक्षा व्हावी आणि पीडित कुटुंबाला त्वरित न्याय मिळावा, यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष आक्रमक झाला आहे. पक्षाचे नेते तथा राज्याचे माजी विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे यांनी वर्ध्याचे पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांची भेट घेऊन या प्रकरणात तात्काळ आणि कठोर कारवाई करण्याची मागणी केली.



'फास्ट ट्रॅक' कोर्टात खटला चालवून फाशी द्या, अशी मागणी दानवे यांनी यावेळी केली. पोलीस प्रशासनाशी चर्चा करताना पीडित कुटुंबाच्या सुरक्षेचा आणि न्यायाचा मुद्दा अत्यंत आक्रमकपणे मांडला. जलद गतीने तपासः या अत्यंत संवेदनशील प्रकरणाचा तपास कोणत्याही दबावाशिवाय, सखोल आणि जलद गतीने केला जावा. फास्ट ट्रॅक कोर्टः खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवून आरोपीला लवकरात लवकर फाशी किंवा कठोरात कठोर कायदेशीर शिक्षा दिली जावी. पीडित कुटुंबाला धीरः पीडित कुटुंबाला तात्काळ कायदेशीर व आर्थिक मदत मिळवून द्यावी. पोलीस अधीक्षकांची भेट घेताना अंबादास दानवे यांच्यासोबत शिवसेना (UBT) वर्धा जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची मोठी फौज उपस्थित होती. यामध्ये जिल्हाप्रमुख अनंत देशमुख, राजेंद्र खूपसरे, जिल्हा संघटक प्रमोद बोंबले, रवींद्र चव्हाण, प्रमोद भटे, सतीश धोबे, मनोज देवके, संजय पांडे, पंकज मयेकर, विलास वैद्य आणि कोडमकरताई यांचा प्रामुख्याने समावेश होता.

## गोर गरीब बांधवांच्या मुक्या जनावरांची निशुल्क वैदयकिय सेवा देणारे डोणगावातील आवलिया!

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ संदीप पळसकर

**डोणगाव :** या परिसरातील मुक्या पशूंना मोफत सेवा देणारे डोणगाव येथे दोन आवलिया आपल्या कार्याचा कुठेही कसलाही गाजावाजा न करता पशु सेवा अविरत कारित आहेत. त्यांच्या कार्याचा गुणगौरव गोरगरीब पशुपालक तसेच गावकरी करतांना दिसत आहेत. पशु वैद्य डॉ. अक्षय विढोळे व डॉ.अभि दिनोरे यांना आपण कुठेही पशुसेवेसाठी बोलावल तर ते कसलाही विलंब न करता हे दोघेही डॉक्टर स्वखर्चाने पशु सेवा देत आहेत. सध्याच्या काळात कुणी हिं कुणाला मोफत सेवा देत नसतात तर काही डॉक्टरांनी आधीच या पेशाला काळीमा फासलेला आपण बघताहोत मात्र या दोन आवलीयांना पशुपालक जेवढे मानधन देतील त्यामध्येच समाधान मानून आपली पशुवैद्यकीय सेवा दिली आहे व कोणी काही नाही दिले तरी त्यांनी आपली वैद्यकीय सेवा नियमित सुरळीत सुरू ठेवलेली आहे. या दोन्ही पशुवैद्यकीय डॉक्टरांनी आतापर्यंत हरीण,माकड,कुत्रे,गाई,म्हशी, बैल व रोही इत्यादी पशूंना जीवदान दिले आहे. त्यांच्या या पशु सेवेचा



गुणगौरव परिसरातील पशुपालक व गावकरी करताना दिसत आहेत. त्यांचे हे कार्य अखंडित असेच सुरू राहो! सलाम त्यांच्या या कार्याला!

**माझी डोणगाव येथे हिरकणी दूध डेरी असून माझा नेहमीच पशुपालकांची संबंध येतो. त्यावेळी हे सर्व पशुपालक या दोन डॉक्टरांचा गुणगौरव करताना मला प्रकर्षाने जाणवले.**

**- अनंत आखाडे**
**दूध डेअरी संचालक डोणगाव**

**पशु सेवा हीच ईश्वर सेवा असते अशी माझ्या आई-वडिलांची शिकवण मला लहानपणापासून मिळाली आहे. त्याचाच एक भाग म्हणून मी हि सेवा अविरत सुरू ठेवणार आहे!**

**- डॉ.अक्षय विढोळे डोणगाव**

**मला ही सेवा करून एक आत्मिक व आध्यात्मिक समाधान मिळते. आपल्या अध्यात्मात दिलेलेच आहे मुक्या पशुची सेवा ही ईश्वर सेवे पेक्षा कमी नसते.**

**- डॉ. अभि दिनोरे डोणगाव**

## मनसे रायगड जिल्हा उपाध्यक्षपदी दिलीप पाटील यांची निवड; पक्षप्रमुख राजसाहेब ठाकरे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ किरण बांधणकर

**पेण :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पक्षप्रमुख राज ठाकरे यांनी रायगड जिल्हा उपाध्यक्षपदी दिलीप पाटील यांची नियुक्ती केली आहे. मुंबई येथे राज ठाकरे यांच्या हस्ते दिलीप पाटील यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

दिलीप पाटील यांनी पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी तसेच विविध सामाजिक व जनहिताच्या प्रश्नांवर सातत्याने काम केले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत पक्षश्रेष्ठींनी त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे. या नियुक्तीमुळे रायगड जिल्ह्यातील मनसेच्या संघटनात्मक बांधणीला अधिक बळ मिळणार असल्याची भावना पक्षाच्या



पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे. यावेळी दिलीप पाटील यांनी पक्षप्रमुख राज ठाकरे यांचे आभार मानत, पक्षाने टाकलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करणार असल्याचे सांगितले. तसेच रायगड जिल्ह्यात पक्षाची संघटना अधिक सक्षम करून युवकांना पक्षाशी जोडण्यावर भर देणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी मनसे रायगड जिल्हा अध्यक्ष बाळाशेठ म्हात्रे,महीला जिल्हा अध्यक्षा छायाताई शिंदे,जिल्हा सचिव पंकज शहा,महिला उप जिल्हा अध्यक्षा हर्षदा पाटील,रमेश पाटील,चिन्मय पाटील,यश पाटील,राजू पाटील,हरेश म्हात्रे,रोशन घरत,हिरामण घरत आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. दिलीप पाटील यांच्या निवडीबद्दल रायगड जिल्ह्यातील मनसे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

